# आत्मचित्र भाग ४०

## (कै. राम गबाले यांच्या 'आत्मचित्र' या आत्मचरित्रात्मक पुस्तकातून क्रमशः)

बालचित्रपटांच्या वेडातून सुटतासुटता पुन्हा माझ्या मनांत कथाप्रधान फीचर फिल्म करण्याचा विचार आला. सातारा-कोल्हापूरकडं अशी अनेक कुटुंबं आहेत, की ज्यांच्या तीनतीन, चारचार पिढ्या सैन्यातच आहेत. अशा कुटुंबातील एखाद्या दहा-अकरा वर्षाच्या मुलाला, त्याचे वडील सीमेवर चिनी परचक्राच्या वेळी लढत असताना, काय वाटत असेल? देशाभिमानाचं बाळकडू मिळालेल्या या मुलाला केवढा चेव येत असेल, आणि बालबुद्धीनं आपण काय करावं, या विचारानं तो कसा भारला असेल; हे कथेचं सूत्र घेऊन मी ती कथा माझ्या दृश्यसंधानाच्या स्वरूपात लिहिली आणि असल्या कथानकावर चित्र करावं अशी इच्छा मला झाली. चित्रकथा, पटकथा लिहिणं हे काही माझं काम नव्हे; पण कोणतीही गोष्ट करण्याची तीव्र इच्छा झाल्यावर आपोआप मार्ग निघतो. माझा कॉलेजमधला मित्र आणि प्रथितयश तंत्रज्ञ मंगेश देसाई याचे वडीलबंधू सदानंद देसाई यांनी एक चित्र करायचं ठरवलं होतं आणि ही कथा त्यांना पसंत पडली. ह्या कथेचा कच्चा आराखडा घेऊन आम्ही आमचे प्रतिभावान लेखक मित्र व्यंकटेश माडगूळकर यांच्याकडे गेलो आणि लेखनाची जबाबदारी अण्णा आणि व्यंकटेश या दोघांवर सोपवली. त्यांनी ती आपल्या सिद्धहस्त लेखणीद्वारे पूर्ण केली. 'राजकमल' सोडल्यानंतर बराच काळ लोटल्यावर मी ही फीचर फिल्म दिग्दर्शित केली. याचा मुहूर्त 'राजकमल'मध्येच व्ही.शांताराम यांच्या हस्ते, आशा भोसले यांच्या गाण्यानं केला. श्री.वसंत देसाई हे या चित्राचे संगीत दिग्दर्शक. या चित्राचे निर्माते श्री.सदानंद देसाई यांचे वसंतराव देसाई हे काका. सदानंद देसाई, मंगेश देसाई, वसंतराव देसाई या कुटुंबात मी सामील झालो. या चित्राची मूळ कथा माझी होती, तसेच मी या चित्राचा सहनिर्माताही होतो. 'छोटा जवान' या चित्राचा छोटा नायक महेश कोठारे हा होता. अतिशय कुतूहल असणारा, चुणचुणीत, प्रेमळ, भाबडा दिसणारा हा मुलगा या भूमिकेत छानच रमला. त्याच्या हालचालीत आणि चौकस बोलण्यांत त्याच्यातला भविष्यातला दिग्दर्शक कलाकार दिसत होता. अभ्यास संभाळून त्यानं काम केलं. या चित्रपटात कलाकार श्री. गजानन जागीरदार, सुलोचनाबाई, जयराज, धुमाळ वगैरे मंडळी लाभली. राम एडेकरांसारखे कला दिग्दर्शक लाभले. त्यांची या चित्राला खूपच मदत झाली.

या चित्रपटासाठी संरक्षण मंत्रालयाचं साहाय्य हे निश्चित अवश्य होतं.

फोननं दिल्लीशी संपर्क साधून सर्व ठरवायचं होतं. त्यावेळी आदरणीय यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री होते. दिवस व भेटीची वेळ दुसऱ्या दिवशी संध्याकाळची ठरली. त्याप्रमाणं सदानंद देसाई, गदिमा, वसंतराव देसाई आणि मी दिल्लीला गेलो. गेल्यावर यशवंतरावजींचे पी. ए. श्री. डोंगरे यांच्याकडून कळलं, की साहेबांना तातडीनं डेहराडूनला जावं लागलं. झालं! आम्ही निराश झालो. यशवंतरावजींना प्रथम भेटायची आमची अतिशय इच्छा होती. एवढ्यांत फोन आला आणि आम्ही निरोपाप्रमाणं आलो आहोत का, अशी विचारणा झाली. आम्हांला डेहराडूनला पाठवून देण्याची व्यवस्था करावी असा हुकूम होता. कोण कोण आले आहेत याची चौकशी झाली आणि गदिमा आले आहेत म्हटल्यानंतर स्वत: यशवंतरावजींनी फोन घेतला आणि ते अण्णांशी बोलले.

ठरल्याप्रमाणं आम्ही डेहराडूनला पोचलो. साहेबांची भेट झाली. आर्मीच्या अधिकाऱ्यांची एका क्लबमध्ये सभा होती. सभेला जाण्यासाठी यशवंतरावजी तयार होते. सभेला समारंभाचं स्वरूप असल्यानं यशवंतरावजींच्या मनांत आम्हांला घेऊन जायचं होतं. निघताना आम्हांला म्हणाले, "चला, आम्हांला हिंदी बोलणं कसं काय जमतं बघा. निघू या." आम्ही समारंभाला गेलो. समारंभाच्या ठिकाणी पोचताच स्वागताला आर्मीची अधिकारी मंडळी होती. आर्मीच्या पद्धतीनं स्वागत झाल्या झाल्या आंत जातानाच एक अधिकारी बाळ सोवनी हे माझ्या परिचयाचे निघाले. ते एकदम मला म्हणाले, "अरे! गबाले तुम्ही इकडे?" मी इथं कशासाठी आलोय, वगैरे बोललो. एवढ्यात यशवंतरावजी म्हणाले, "अच्छा, इथं तुमच्या कुणी ओळखीचं निघालं काय?"

रात्री मुक्कामाला आल्यानंतर बंगल्याच्या मागील परिसरात वेताच्या आरामखुर्च्या ठेवण्यात आल्या आणि तिथं गदिमा आणि व्यंकटेश माडगूळकर यांनी लिहिलेल्या 'छोटा जवान' या कथेचं वाचन झालं. यशवंतरावजींनी अण्णांना 'कथा छानच आहे' म्हणून सांगितलं आणि म्हणाले, "तुम्ही यांत दाखवलंय ना, तसे आपले जवान इथून काही मैलांवरच आपल्या सीमेचं संरक्षण करत आहेत."

एक साधं मराठी चित्रं आहे, या भावनेतून जेवढं म्हणून सहानभूतीनं साहाय्य देता येईल तेवढ्या थोड्या खर्चात साहाय्य मिळालं. त्या सोपस्कारासाठी, पत्रव्यवहार व भेटीसाठी माझ्या दिल्लीला फेऱ्या झाल्या. राम प्रधान यांच्यासारखे अधिकारी असल्यानं चोखपणे सारे सरकारी सोपस्कार संभाळून काम पूर्ण झालं. मला अशा तऱ्हेच्या चित्राचा हा पहिलाच अनुभव होता.

चित्रपटाचं चित्रण अपेक्षेप्रमाणे पूर्ण झालं. श्री.जयराजजींचा इतका जवळिकीचा सहवास लाभला. वयाचं भान न ठेवता चित्रणाच्या वेळेचं त्यांचं धाडस आणि

जीव ओतून काम करण्याची त्यांची पद्धत चित्रणात सहभागी होणाऱ्या जवानांना थक्क करत होती. जयराज हे मूक चित्रपटांच्या जमान्यापासून गाजलेले कलाकार. त्यांच्या त्या वेळच्या वयाच्या मानानं अतिशय चपळ. आम्ही या चित्राचं बरचसं चित्रण 'प्रभात'मध्ये आणि युद्धाचं वगैरे बाह्यचित्रण नाशिकजवळ त्र्यंबकेश्वरच्या अलीकडं केलं. हिमालयातल्या पर्वतराजीत ते जाऊन करणं मराठी निर्मात्याला शक्यच नव्हतं. जयराजजी कामाबाबतीत अगदी नियमित कष्ट करत; प्रसंगी धोकाही पत्करत. तंत्रज्ञांशी, जवानांशी अतिशय नम्रपणे मिळून मिसळून त्यांना वागताना पाहून सर्वांना कौतुक वाटे.

चित्रपटातल्या युद्धातल्या चकमकींचं चित्रण करताना डमी गोळ्या भरून खराखुरा गोळीबार करावा लागत असे. त्यावेळी मात्र कुठं काही अपघात घडून विपरीत घडू नये एवढं कटाक्षानं लक्ष द्यावं लागे. माझ्यातर पोटात चित्रण पुरं होईपर्यंत गोळाच येत असे.

आता चित्रपट पूर्ण झाला होता. फक्त री-रेकॉर्डिंग व्हायचं होतं. प्रसिद्ध रेकॉर्डिस्ट असलेल्या आमच्या मंगेश देसाईला पायाला फ्रॅक्चर वगैरे झाल्याचं कळल्यानंतर मी पुण्याहून मुंबईला दोन-तीन दिवसांसाठी आलो होतो. मंगेशचं कसं आहे ही चौकशी करण्यासाठी 'राजकमल'मध्ये आलो. चौकशीसाठी थेट रेकॉर्डिंगरूमध्ये गेलो. पाहतो तर पायाला पूर्ण बँडेज लावलेलं आणि पाय स्टूलावर ठेवून मंगेश बसलेला. 'छोटा जवान'च्या रीलची, म्युझिक आणि इफेक्ट ट्रॅक्सची ट्रायल घेत बसलेला होता. मी एकदम आश्चर्यानं थक्क होऊन म्हणालो, "मंग्या! (हा माझा कॉलेजपासूनचा मित्र) तू कामाला आला आहेस?" मंगेश म्हणतो, "काय करतोस बाबा? तू माझा बाप येणार होतास ना? आणि तुझं काम न करून काय करू!" हृषीकेश मुखर्जी आमचे दोघांच्याही जवळचे स्नेही. मी आणि मंगेश एकमकांशी एखादे दिवशी सरळ बोललो की विचारत असत, "का रे आज तुमची तब्येत बरी नाही का?" मंगेश हा आमच्या व्यवसायातला फार मोठा तंत्रज्ञ, आम्ही एकमेकांवर जिवापाड प्रेम केलं. त्याचा-माझा परिचय कोल्हापूरला असताना कॉलेजपासूनचा. १९४२ च्या चळवळीतला हा प्रत्यक्ष काम करणारा, आता आंतरराष्ट्रीय कीर्तीचा रेकॉर्डिस्ट झाला होता.

'छोटा जवान' चित्रपट थिएटरला लागला. सदानंद देसाई यांच्या मित्रत्वामुळं, राज मेहरा, मनमोहन कृष्ण वगैरे हिंदी चित्रपटातील कलाकार या चित्रात सहभागी झाले होते. नांव 'छोटा जवान', जयराज-सुलोचना आणि ही इतर कलाकारांची नावं यामुळं प्रथम प्रेक्षकांना हे चित्र हिंदी वाटलं. प्रेक्षकांचा ओघ थिएटरकडे यायला थोडा वेळ लागला. या चित्राला महाराष्ट्र शासनाचं परितोषिक

मिळाल्यानंतर हे चित्र शाळा-शाळांतून गटांनी दाखवण्याची एक योजना कार्यान्वित झाली आणि चित्र खूपच लोकप्रिय झालं. मुलांना इतकं आवडलं, की मुलं घरच्या लोकांना पाहायला पुन्हा घेऊन येऊ लागली. आज मला एखाद्या मोठ्या व्यवसाय केंद्रामध्ये तिथले अध्यक्ष वगैरे उच्च पदाधिकारी भेटतात आणि म्हणतात, "मी हायस्कूलमध्ये असताना तुमचा 'छोटा जवान' पाहिलाय." 'माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू, जिंकू किंवा मरू' सारखं गाणं ऐकू येतं, तेव्हा मला विशेष समाधान मिळतं. आपल्या देशाच्या संरक्षणासाठी लढणाऱ्या आपल्या जवानांच्या त्यागाची जाण या चित्रपटामुळं मुलांच्या मनात निर्माण झाली, ही खरी मोलाची गोष्ट.

– कै. राम गबाले

('आत्मचित्र' पुस्तकासाठी भारतातील संपर्क – अरुण जाखडे २५४४२४५५)